REGISTERED No. B. 3434




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १४ पुणें, बुधवार तारीख १४ जुलै, १९४८ अंक २८


## दि रत्नाकर बँक, लि.

स्थापना : १९४३

—: शाखा :—

(१) कोल्हापूर, (२) शाहुपुरी, (३) सांगली, (४) मिरज, (५) जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | ... | २०,१२,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | ६,२७,२०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ३,१३,६०० |
| रिझर्व्ह फंड | ... | १०,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ३८,००,००० |

—अद्यावत बँकिंग व्यवहार केले जातात—

नामदार बी. बी. पाटील. B. A., LL. B., डेव्हलपमेंट मिनिस्टर, सांगली स्टेट. चेअरमन

श्री. गं. सि. चौगुले. M. L. A. कोल्हापूर व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा. B. Com., C. A. I. I. B. मॅनेजर

## दि डेक्कन पॉटरीज अ‍ॅण्ड अलाइड इंडस्ट्रीज, लि.

रजिस्टर्ड ऑफिसः—१९६।२९, सदाशिव पेठ, पुणें २

कारखानाः—चिंचवड ( जी. आय्. पी. रेल्वे ) पुणें शहरानजीक. तारेचा पत्ताः—'पॉटर्स', पूना.

चेअरमन—रावबहादुर गणेश गोपाळ शेंबेकर, जमीनदार, बारामती.

★ कंपनी कपबशा, बरण्या, फायर ब्रिक्स, कौलें वगैरे नित्योपयोगी माल तयार करण्याकरितां स्थापन झाली आहे.

★ कंपनीच्या जागेंत कारखान्याची इमारत, भट्टी, चिमणी व गोडाऊन बांधून पुरें झालें आहे.

★ कच्चा माल कारखान्यांत आलेला असून मशिनरी बसविण्याचें काम सुरू आहे.

मेसर्स नॅशनल ट्रेडिंग कंपनी, पुणें २.

मॅनेजिंग एजन्टस्.

शेअर्स वगैरे माहितीकरितां कंपनीच्या रजिस्टर्ड ऑफिसशीं पत्रव्यवहार करावा.

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें










वर्कशॉप मशिनरी (२)
हेवी ड्यूटी
**शिमोगा लेथ**
(८′—१०″)
संपूर्ण देशी. पहिल्या प्रतीचा, तज्ज्ञांचे देखरेखीखालीं कुशल कारागिरांनीं अद्यावत साधनांनीं बनविलेला
— चौकशी स्थान —
केळकर बंधु, बुधवार चौक, पुणें २.


## विविध माहिती

**गांधी–स्मारक फंडाला धनिकांची मदत**—गांधी स्मारकाच्या उद्योगपतींच्या कमिटीची बैठक नुकतीच भरली होती. कमिटीचे अध्यक्ष श्री. घनश्यामदास बिर्ला आहेत. निरनिराळ्या॰ उद्योगधंद्यांकडून स्मारकनिधीसाठी पुढीलप्रमाणें देणग्या मिळविण्याचें ठरविण्यांत आलें. सगळ्यांत अधिक वर्गणी कापडाच्या गिरण्यांच्या धंद्यावर बसविण्यांत आली आहे. ह्या धंद्यातर्फे २½ कोटी रुपये फंडाला मिळावयाचे आहेत. साखर व तागाच्या कारखान्यांकडून प्रत्येकीं ५० लाख रुपये मिळावयाचे आहेत. चहाच्या मळ्यांकडून ३२ लाख, पोलादाच्या कारखान्यांकडून २५ लाख, कोळशाच्या खाणींकडून २५ लाख व कागदाच्या धंद्यांकडून ८ लाख असे आकडे ठरविण्यांत आले आहेत. उद्योगधंद्याकडून एकूण ५ कोटी रुपये स्मारक–निधीसाठी जमविण्यांत यावयाचे आहेत. ज्या उद्योगधंद्यांकडून मिळवावयाची वर्गणी निश्चित करण्यांत आलेली नाहीं, त्यांच्याकडून १९४६ अगर ४७ सालापैकीं ज्या सालांत अधिक नफा झाला असेल त्याच्या ५ टक्के वर्गणी मिळविण्याचें ठरविलें आहे. सर्व वर्गण्या ता १५ सप्टेंबर १९४८ पूर्वी जमा करून २ ऑक्टोबर १९४८ ह्या दिवशीं म्हणजे महात्माजींच्या जन्मतिथीच्या दिवशीं फंडाला देण्यांत येणार आहेत.

**गांधी स्मारक निधीस सहकारी मंडळ्यांच्या देणग्या**—महात्मा गांधी राष्ट्रीय स्मारक निधीस सर्व सहकारी सोसायट्यांनीं आपल्या निवळ वार्षिक नफ्याची २०% पर्यंत रकमेइतकी देणगी द्यावी, अशी प्रां. स. इन्स्टिट्यूटनें सोसायट्यांना विनंती केली आहे. प्रत्येक सोसायटीनें आपण किती देणगी दिली, तें इन्स्टिट्यूटला कळवावयाचें आहे. स्मारक निधीस सहकारी मंडळ्यांनीं देणगी देऊन हातभार लावावा, अशी सूचना आम्ही "अर्था"च्या गेल्या अंकांत केली होती आणि खात्यानें व इन्स्टिट्यूटनें त्या संबंधांत एकादें सर्क्युलर काढावें असेंहि प्रतिपादन केलें होतें, हें वाचकांस स्मरत असेलच.

**रुपये देऊन डॉलर घेतले**—इंटरनॅशनल मॉनेटरी फंडाकडून हिंदुस्थानानें ८०,६०,००० अमेरिकन डॉलर त्यांच्या बद्ली योग्य तेवढे रुपये देऊन विकत घेतले आहेत. हिंदुस्थानास परराष्ट्रांत अन्नधान्य व इतर माल ह्यांच्या खरेदीसाठी डॉलर लागतील, त्याची ही तरतूद आहे.

**ॲटलॅंटिक–भूमध्य कालव्याची कल्पना**—ॲटलॅंटिक महासागर व भूमध्य समुद्र ह्यांस जोडणारा १५० मैल लांबीचा एक कालवा खोदण्याची कल्पना फ्रान्समध्यें पुढें आली आहे. ती फलद्रूप झाल्यास जिब्राल्टरच्या लांबीच्या मार्गाचा अवलंब करावा लागणार नाहीं व त्यामुळें प्रवासाची मुदत तीन दिवसांनीं कमी होईल. युद्धप्रसंगींहि त्या कालव्याचा चांगला उपयोग होईल. ह्या कालव्याची कल्पना प्रत्यक्ष कृतींत उतरविण्याचें ठरलें, तर ३०,००० मजुरांना ८ वर्षें त्याकरितां राबावें लागेल व त्यास २०० कोटी रुपये खर्च येईल. अर्थात्, अमेरिकेसच हें भांडवल द्यावें लागेल!

**आयात गहूं महाग मिळणार**—आंतरराष्ट्रीय गहूं कराराप्रमाणें हिंदुस्थानास ठराविक कमाल-किमान दरानें ७,५०,००० टन गहूं मिळावयाचा होता. परंतु, कांहीं महत्त्वाचे देश त्या करारावर सही करण्यास नकार देत असल्याकारणानें, हिंदुस्थानास आयात करावा लागणारा गहू आतां महाग दरानें विकत घ्यावा लागणार आहे.


**पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड.**
**पुणें शहर.**
**नोटीस**

या बँकेच्या सन १९४८–४९ च्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्सची निवडणूक व्हावयाची आहे. त्यासाठी वैयक्तिक मतदारांची यादी तयार झाली असून ती बँकेच्या मुख्य कचेरीत व शाखा कचेऱ्यांत नोटीस बोर्डावर निवडणुकीच्या नियम नं. ३ प्रमाणें लावली आहे. तरी निवडणुकीसाठीं लायक उमेदवारांचीं नांवें सूचक व अनुमोदक यांच्या सहीसह व उमेदवाराच्या लेखी संमतीनें तारीख १० ऑगस्ट १९४८ रोजीं दुपारी चार वाजण्यापूर्वी बँकेच्या मुख्य कचेरींत दाखल होतील अशा बेतानें पाठवावीत. सदर बाबत कोणास जास्त माहिती पाहिजे असल्यास त्यांनीं बँकेच्या कचेरीच्या वेळांत चौकशी करावी म्हणजे ती त्यांना देण्यांत येईल.

पुणें शहर. — व. वि. चितळे,
तारीख ११ जुलै, १९४८. — मॅनेजिंग डायरेक्टर,
पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड,
पुणें शहर.

**पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड.**
**पुणें शहर**
**नोटीस**

या बँकेच्या सन १९४८–४९ सालच्या हिशेबाची तपासणी करण्याकरितां येत्या वार्षिक साधारण सभेनें दोन हिशेब तपासनीसांची नेमणूक करावयाची आहे. तरी सदर जागांसाठीं ज्यांस उमेदवार म्हणून उभे रहावयाचे असेल त्यांनीं आपले अर्ज बँकेच्या पुणें कचेरींत तारीख ३१ जुलै १९४८ रोजीं दुपारी चार वाजण्यापूर्वी दाखल होतील अशा बेतानें पाठवावेत. उमेदवारानें अर्जांत आपलें संपूर्ण नांव, पत्ता व लायकी अवश्य नमूद करावी. हिशेबतपासनीसांच्या नेमणुकीसंबंधीं बँकेनें केलेले नियम मुख्य कचेरीत कामाचे वेळांत पहावयास मिळतील.

पुणें शहर — व. वि. चितळे,
तारीख ११ जुलै, १९४८. — मॅनेजिंग डायरेक्टर,
पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक, लि.,
पुणें शहर.

-सर्व प्रांतांतील-
सुती – गरम – रेशमी
—खादीचें माहेरघर—
**खादी मन्दिर**
२६२, बुधवार पेठ, हमदेरे बोळाजवळ, पुणें २

# अर्थ

बुधवार, ता. १४ जुलै १९४८





प्रो. वा. गो. काळे


संपादक :

श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## रिझर्व्ह बँकेच्या व्यवहाराची फाळणी

### स्टेट बँक ऑफ पाकिस्तानला तोडून दिलेलें देणें व जिंदगी

१ जुलैपासून हिंदी रिझर्व्ह बँकेची, पाकिस्तानची मध्यवर्ती बँक ही भूमिका नाहींशी झाली व स्टेट बँक ऑफ पाकिस्ताननें ती भूमिका पत्करून व्यवहारास प्रारंभ केला. ह्यामुळें, रिझर्व्ह बँकेच्या इश्यू व बँकिंग खात्यांच्या ताळेबंदांत महत्त्वाचे फरक घडून आले आहेत. इश्यू खात्याचे तुलनात्मक आकडे खाली दिले आहेत.

**इश्यू खातें—देणें**

| | २५-६-४८ | २-७-४८ |
|---|---|---|
| बँकिंग खात्यांतील नोटा | | |
| (अ) हिंदी नोटा | ३१,०७,९८,००० | २९,६४,७३,००० |
| (ब) पाकिस्तानी नोटा | १०,००० | ——— |
| व्यवहारांतील खेळत्या नोटा | | |
| (अ) हिंदी नोटा | १२७५,०७,३५,००० | १२६९,८८,२२,००० |
| (ब) पाकिस्तानी नोटा | ४४,७८,८८,००० | ——— |
| एकूण काढलेल्या नोटा | १३,५०,९४,३१,००० | १२९९,५२,९५,००० |
| एकूण देणें | १३,५०,९४,३१,००० | १२९९,५२,९५,००० |

बँकिंग खात्यांत ठेवलेल्या पाकिस्तानी नोटा आणि व्यवहारांतील पाकिस्तानी नोटा आतां रिझर्व्ह बँकेच्या देणें बाजूस दिसत नाहींत; त्यांचे बदली रुपये देण्याचे रिझर्व्ह बँकेवर बंधन उरलेलें नाहीं. एकूण काढलेल्या नोटांची रक्कम ५१ कोटी, ४१ लक्ष रुपयांनीं कमी झाली आहे, आणि व्यवहारांत खेळणाऱ्या नोटांत ५ कोटी, १९ लक्ष रुपयांची घट दिसत आहे. रिझर्व्ह बँकेचें देणें कमी झालें, त्याप्रमाणेंच त्याचे संबंधांतील जिंदगीचा भागहि स्टेट बँक ऑफ पाकिस्तानला द्यावा लागल्याकारणानें इश्यू खात्याच्या ताळेबंदाची जिंदगीची बाजूहि फरक दर्शवीत आहे.

**इश्यू खातें—जिंदगी**

| | २५-६-४८ | २-७-४८ |
|---|---|---|
| अ सोनें | | |
| (१) हिंदुस्थानांत | ४४,४१,४५,००० | ४२,७१,९१,००० |
| (२) हिंदुस्थानाबाहेर | —— | —— |
| स्टर्लिंग रोखे | ११३५,३२,८९,००० | ११००,८०,४७,००० |
| अची बेरीज | ११७९,७४,३४,००० | ११४३,५२,३८,००० |
| ब रुपये | | |
| (१) हिंदी | २९,९०,६१,००० | ४१,८५,७६,००० |
| (२) पाकिस्तानी | ३,४५,३१,००० | ——— |
| हिंदुस्थान सरकारचे रोखे | १२७,८४,०५,००० | ११४,१४,८१,००० |
| | १३५०,९४,३१,००० | १२९९,५२,९५,००० |

रिझर्व्ह बँक १३ वर्षांपूर्वी स्थापन झाली, त्या दिवसापासून तिच्या इश्यू खात्याच्या ताळेबंदांत जिंदगीचे बाजूस अग्रस्थानीं ४४ कोटी, ४१ लक्ष, ४५ हजार रुपयांचें सोनें दिसत होतें. त्यापैकीं १ कोटि, ६९ लक्ष ५४ हजार रुपयांचें सोनें आतां पाकिस्तानच्या मध्यवर्ती बँकेस द्यावें लागल्याकारणानें, हिंदी रिझर्व्ह बँकेजवळील सोनें आतां ४२ कोटी, ७१ लक्ष, ९१ हजार रुपयांचें उरलें आहे स्टर्लिंग रोखेहि ३४ कोटि, ५२ लक्ष रुपयांच्या किंमतीनें कमी झाले आहेत आणि हिंदी रोख्यांतहि १३ कोटि, ६९ लक्ष रुपयांची घट आहे. बँकेजवळील स्टर्लिंग रोखे सुमारें ३५ कोटी रुपयांनीं कमी झाले, म्हणजे तेवढे रोखे पाकिस्तानला दिले असा अर्थ झाला.

रिझर्व्ह बँकेच्या बँकिंग खात्याच्या ताळेबंदांतहि महत्त्वाचे बदल झाले आहेत. पाकिस्तानच्या मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांच्या ठेवी आजवर हिंदी रिझर्व्ह बँकेकडे ठेवल्या जात, त्या आतां स्टेट बँक ऑफ पाकिस्तानकडे वर्ग झाल्या आहेत. पाकिस्तानांतील शेड्यूल्ड बँकांनींहि आपल्या शिलका पाकिस्तानी मध्यवर्ती बँकेंत ठेवावयाच्या आहेत. रिझर्व्ह बँकेच्या बँकिंग खात्याच्या ताळेबंदांतील देणें बाजूस १०४ कोटी रुपयांची घट झाली आहे. अर्थातच, त्या प्रमाणांत जिंदगीहि कमी झाली पाहिजे. रिझर्व्ह बँकेच्या हिंदुस्थानाबाहेर रोख शिलकेंत व अल्प मुदतीच्या रोख्यांतच मुख्यतः ही कपात झाली आहे.

## महागाई कशी वाढत आहे ?

| | ऑगस्ट १९३९ अखेरचें वर्ष | मे १९४७ | एप्रिल १९४८ | मे १९४८ |
|---|---|---|---|---|
| खाद्यपदार्थ | १०० | २७८·६ | ३४८·८ | ३५७·६ |
| औद्योगिक कच्चा माल | १०० | ३५२·६ | ४१४·६ | ४४२·३ |
| अर्धा-पक्का तयार माल | १०० | २४९·० | २९९·८ | ३१७·९ |
| पक्का माल | १०० | २७१·६ | ३२५·८ | ३५०·३ |
| इतर माल | १०० | ४५३·२ | ४७८·५ | ५०४·२ |
| सर्व प्रकारचा माल | १०० | २८८·५ | ३४८·९ | ३६६·९ |

मे, १९४८ मध्यें एप्रिल, १९४८ च्या मानानें घाऊक मालाच्या किंमतीचा निर्देशांक ५·२% नें वाढला; परंतु मे, १९४७ शीं तुलना केली तर वाढीचें प्रमाण २७·२% इतकें होतें.

**खान्यांत दारूला बंदी**—सरकारी अगर निम-सरकारी खान्यांच्या प्रसंगीं पाहुण्यांना दारू देण्यांत येऊं नये, अशी आज्ञा मद्रास सरकारनें आपल्या नोकरांना उद्देशून काढली आहे.

**खाणीमजुरांना बोनस**—बंगाल, बिहार, मध्यप्रांत आणि ओरिसा ह्या प्रांतांतील कोळशाच्या खाणींतील मजुरांना त्यांच्या मूळ पगाराच्या एक तृतियांश बोनस दर तीन महिन्यांनीं देण्याची योजना जाहीर झाली आहे. योजना मध्यवर्ती सरकारच्या जादा गॅझेटांत एक वटहुकूम काढून प्रसिद्ध करण्यांत आली आहे.

## स्फुट विचार

### हिंदुस्थान–झेकोस्लोव्हाकिआ व्यापार

संयुक्त राष्ट्रसंघाच्या आशिआ–आर्थिक–समितीची बैठक उटकमंड येथें नुकतीच होऊन गेली. समितीपुढें भाषण करतांना अमेरिकन प्रतिनिधींचे पुढारी डॉ. ग्रॅडी ह्यांनीं हिंदुस्थानला भांडवली स्वरूपाचा माल पुरविण्याबाबत फारशी उत्सुकता दाखविली नाहीं. त्यामुळें हिंदुस्थानच्या उद्योगपतींना व सरकारला आतां केवळ अमेरिकेवर विसंबून राहून चालणार नाहीं. झेकोस्लोव्हाकिआंत गेल्या फेब्रुवारीमध्यें कम्युनिस्ट क्रांति झाली असली तरी त्या राष्ट्राकडून भांडवली स्वरूपाचा माल मिळत असल्यास तो घेण्यास कोणतीच हरकत असूं नये. गेले कांहीं आठवडे हिंदुस्थानांत झेक तज्ञांचें एक प्रतिनिधी मंडळ व्यापाराची शक्यता अजमावण्यासाठीं हिंडत आहे. ह्या प्रतिनिधी मंडळाचे पुढारी मि. रुवेस्का ह्यांनीं कलकत्त्यांतील बेंगॉल चेंबर ऑफ कॉमर्स ह्या संस्थेशीं विचारविनिमय केला. त्यांनीं असें सांगितलें कीं अवजड अशी यंत्रसामुग्री मोठ्या प्रमाणावर देण्याचें झेकोस्लोव्हाकिआला आज शक्य होणार नाहीं; तथापि छोट्या प्रकारची यंत्रसामुग्री मात्र बरीच देता येईल. उदाहरणार्थ, कापडाच्या गिरणीची यंत्रसामुग्री, वीज उत्पन्न करणाऱ्या धरणाची यंत्रसामुग्री, रसायनें करण्याची यंत्रसामुग्री इत्यादी भांडवली माल झेक देश हिंदुस्थानला देऊं शकेल. युद्धपूर्वी हिंदुस्थानकडून झेकोस्लोव्हाकिआ भुईमूग, कापूस, कच्चा ताग, कातडी वगैरे माल आयात करीत असे. ह्या मालाच्या बदली भांडवली स्वरूपाचा माल द्यावयास झेक सरकार तयार असेल, तर त्याचा फायदा जरूर घेतला जावा. झेकोस्लोव्हाकिआ जगांतील एक पुढारलेला उद्योगप्रधान देश असल्यामुळें यंत्रशास्त्रदृष्ट्या पूर्णपणें आधुनिक आहे. शिवाय दुसरें असें कीं, हिंदुस्थान–झेकोस्लोव्हाकिआ व्यापारांत हुंडणावळीची अडचण येण्याचें कारण नाहीं. झेकोस्लोव्हाकिआंत जाणारें हिंदी-व्यापारी मंडळ ह्या परिस्थितीचा फायदा घेईलच.

### गुमास्ता कायद्याची अंमलबजावणी

१९४६ सालांत मुंबई सरकारचा गुमास्ता कायदा २१ नवीन गांवांना लागू करण्यांत आला. कांहीं ठिकाणीं गांवांच्या म्युनिसिपालिट्यांनीं कायद्याचा अंमल करण्याचें कबूल केलें नाहीं. कारण असें देण्यांत आलें कीं, कायद्याच्या अंमलबजावणीचा खर्च झेपणार नाहीं. तथापि दुकानांतून काम करणाऱ्या नोकरांकडून पुन्हां पुन्हां विनंती करण्यांत आल्यामुळें अशा म्युनिसिपालिट्यांच्या विरोधाला न जुमानता कायदा लागू करण्यांत आला. बऱ्याच म्युनिसिपालिट्यांनीं अंमलबजावणी करण्यासाठीं ह्या कामास पुरेसे लायक नसलेले इन्स्पेक्टर्स नेमण्याची परवानगी सरकारकडे मागितली. कांहीं थोड्या स्थानिक संस्थांना तशी परवानगी कांहीं काळापुरती देण्यांत आली आहे. मुंबई शहरांतील ह्या कायद्याची गेल्या सहा वर्षांची अंमलबजावणी पाहिली, तर उत्तरोत्तर अधिकाधिक नोकरांना त्याचा फायदा होत आहे असें दिसून येतें. कारण, दरवर्षी दुकानांत काम करणाऱ्या नोकरांच्या तक्रारी कमी होत चालल्या आहेत. मुंबई शहरांत ह्या कायद्याखालील गुन्हे स्टायपेंडरी मॅजिस्ट्रेट्समोर चालत, ते १ ऑक्टोबर १९४५ पासून कोर्ट ऑफ ऑननरी मॅजिस्ट्रेट्सपुढें चालू लागले. ह्याचा परिणाम म्हणून दंडाच्या शिक्षेचें प्रमाण कमी झालें आहे. १९४६ सालच्या अहवालांत दंडाच्या रूपानें वसूल झालेली रकम घटलेली दिसून येते. अहमदाबाद म्युनिसिपालिटीनें ह्या कायद्याच्या अंमलबजावणीच्या केलेल्या अहवालांत, कायदा बराच लोकप्रिय झाल्याचें म्हटलें आहे. केवळ हातावर पोट अवलंबून असणाऱ्या दुकानांतील नोकरांना कायद्याचें संरक्षण देण्यांत मुंबई सरकारची प्रगति-प्रियता दिसून येते.

### कापडाच्या किंमती चढल्या, पण फार नाहींत

टेक्स्टाइल अॅडव्हायसरी कंट्रोल बोर्डाचे अध्यक्ष, श्री. कृष्णराज ठाकरसी, ह्यांनीं कापडाच्या वाढलेल्या किंमतीसंबंधीं खुलासा केला आहे. ते म्हणतात:– "कापडावरील नियंत्रण उठल्यावर त्याच्या किंमती विलक्षण वाढल्या; मुंबईत तलम कापडाच्या घाऊक किंमतींत जानेवारीच्या किंमतीपेक्षां २०० ते २५० टक्क्यांची वाढ झाली. जानेवारींत गिरण्यांनीं स्वेच्छेनें कापडाच्या किंमती नियंत्रित केल्या होत्या. मध्यम प्रतीच्या कापडाच्या किंमतींत १०० ते १२५ टक्के वाढ झाली आणि जाड्याभरड्या कापडाच्या किंमती सुमारें १०० टक्क्यांनीं वाढल्या. कापडाच्या ह्या चढलेल्या घाऊक किंमती सरासरी तीन महिने टिकल्या. तथापि, गेल्या कांहीं आठवड्यांत घाऊक किंमती उतरण्यास प्रारंभ झाल्याचें दिसून येत आहे. नियंत्रण उठण्यापूर्वी वायल आणि तलम धोतरें ह्यांच्या ज्या किंमती होत्या, त्यांच्यापेक्षा आजच्या किंमती अनुक्रमें ५५ टक्के व ७० टक्के जास्त आहेत. साधारण तलम धोतरें व साड्या ह्यांच्या किंमती ५५ ते ६५ टक्के वाढलेल्या आहेत. मध्यम प्रतीचें कापड तर फक्त २० ते ४० टक्केच अधिक महाग झालें आहे. ड्रिल, क्रेप, इत्यादी कापडाच्या किंमती तर आज इतक्या उतरल्या आहेत कीं, गिरण्यांना त्या जातीचें कापड काढणें परवडणारच नाहीं. नियंत्रण उठविल्यामुळें कांहींच फायदा झाला नाहीं असें म्हणतां येणार नाहीं. आज किंमती उतरत चालल्या आहेत; त्याची घसरगुंडी थांबण्याचीं चिन्हें दिसत नाहींत. उलटपक्षीं, डिसेंबर १९४७ पासून कापडाचें उत्पादन हळू हळू वाढत चाललें आहे. देशांतील कांहीं भागांत कापडाची फार टंचाई असली, तरी त्याचें कारण वहातुकीची अडचण हें आहे. गिरणीमालकांनीं काढलेल्या योग्य भावाच्या दुकानांतून अधिकाधिक माल खपत आहे."

---

**मागासलेल्या जातींसाठीं घरें**—मागासलेल्या जातींना राहण्यासाठीं चांगलीं घरें मिळावीं म्हणून मुंबई सरकारनें यंदाच्या वर्षी २ लाख रुपये मंजूर केले आहेत.

**बिहारमधील जमीनदारी**—बिहारमधील जमीनदारी नष्ट करण्याचा कार्यक्रम यथाक्रम चालू आहे. सर्व जमीनदारांच्या जमिनी सरकार १५ सप्टेंबरपर्यंत आपणाकडे घेईल.

**ऑस्ट्रेलिआंतील कापड–नियंत्रण उठलें**—आस्ट्रेलिअन सरकारनें ३१ जुलैपासून कापडावरील नियंत्रण उठविल्याचें आणि कापडाची आयात करणाऱ्या व्यापाऱ्यांना देण्यांत येणारी मदत बंद करण्याचें ठरविलें आहे, अशी बातमी आहे. आस्ट्रेलिआंत कापडाची बाजारपेठ खुली झाल्यामुळें मुंबईचे कापड व्यापारी ह्या नवीन बाजारपेठेंत आपला जम बसविण्याचा प्रयत्न करणार आहेत.

**फिनलंडमध्यें सोन्याची खाण**—उत्तर फिनलंडमध्यें सोन्याची खाण सांपडल्यामुळें शेकडो फिनिश नागरिक उत्तरेकडे चालले आहेत. दोन माणसांना नुकतेच १५ ग्रॅम सोनें एके ठिकाणीं सांपडलें. त्यानंतर आणखी कांहीं जणांना ३५ ग्रॅम सोनें सांपडलें. एक ग्रॅम सोन्याची किंमत १,००० फिनिश मार्क्स किंवा ७ अमेरिकन डॉलर आहे.

## उद्योगधंद्यांतील नफ्यांत मजुरांचा वांटा

### भांडवलशाही अर्थव्यवस्थेला पाठिंबा ?

( भा. म. काळे )

अगदी अलिकडे आपल्या अर्थव्यवस्थेमध्यें निर्माण झालेला एक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे औद्योगिक नफ्यांत मजुरांना कांहीं तरी निश्चित वांटा असावा ही मागणी होय. गेल्या वर्षी डिसेंबर-मध्यें अर्थमंत्र्यांनीं बजेट सादर करतांना नफ्यांत मजुरांचा वांटा काय असावा ह्या प्रश्नाचा सरकार विचार करीत असल्याचें सांगितलें. त्या वेळेपासून ह्या नवीन कल्पनेनें उद्योगपतींना धक्का बसला. नंतर औद्योगिक परिषदेंत मालक व मजूर यामध्यें सलोखा नांदावा याबद्दल पास झालेल्या ठरावांत नफ्यांत मजुरांचा वाटा मान्य करण्यांत आला आहे. त्यानंतर अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीच्या आर्थिक कार्यक्रमाच्या कमिटीनें, नफ्यांत मजुरांचा अमूक एका प्रमाणांत वांटा असलाच पाहिजे असें निश्चित शब्दांत ठरावाच्या रूपानें व्यक्त केलें आहे. नंतर सरकारनें आपलें औद्योगिक धोरण जाहिर करतांना, मालक-मजूर संबंध ठरवितांना नफ्यांत मजुरांचा वांटा असला पाहिजे असें नमूद केलें आहे. ह्याप्रमाणें गेल्या कांहीं महिन्यांत, मजुरांना नफ्याचा वांटा मिळाला पाहिजे अशी विचारसरणी रूढ होत चालली आहे व सरकारनें तिला अधिकृत मान्यता दिली आहे.

नफ्यांत मजुरांना वांटा मिळावा हें तत्त्व विचारसरणीच्या दृष्टीनें योग्य आहे, परंतु ह्या तत्त्वाची व्यवहारांत अंमलबजावणी कशी करणार हा महत्त्वाचा मुद्दा आहे. प्रथम प्रत्येक धंद्यांत नफ्याचें प्रमाण निश्चित करणें कठीण आहे. हिशेब अशा तऱ्हेनें ठेवले जातील कीं जरूरीप्रमाणें नफा कमी दाखवितां येईल. दुसरी गोष्ट म्हणजे सर्वच धंदे नेहमीच फायदेशीर होतात असें नाहीं व निरनिराळ्या धंद्यांतील नफ्याचें प्रमाण भिन्न भिन्न असतें. तेजीच्या काळांत एखाद्या धंद्याला भरमसाट नफा होणें शक्य असतें. सारांश, जरी मजुरांच्या नफ्याच्या वाट्याचें प्रमाण निश्चित केलें तरी प्रत्यक्ष व्यवहारांत अनेक अडचणी निर्माण होतील व ज्या एखाद्या धंद्यांत नफ्याचें प्रमाण जास्त असेल अशा धंद्याकडे जाण्याची मजूर वर्गामध्यें प्रवृत्ति दिसून येईल.

परंतु येथें विचाराची आणखी एक महत्त्वाची बाजू आहे. नफ्याचें तत्त्व मान्य करणें हें भांडवलशाही अर्थव्यवस्थेला मान्यता देणें आहे व नफ्याच्या वांटणींत मजुरांचा हक्क मान्य करणें म्हणजे ज्याप्रमाणें भांडवलदार आर्थिक पिळणूक करतात त्याप्रमाणें मजुरांनींहि भांडवलदारांप्रमाणेंच आर्थिक पिळणूक करणें होय. मजूर वर्गाचा जर भांडवलदारांवर आर्थिक पिळणूक करणारे म्हणून कटाक्ष आहे, तर भांडवलदार करीत असलेल्या पापांत मजुरांनींहि वाटेकरी व्हावें काय, हा एक विचार करण्यासारखा प्रश्न आहे. मजुरांना नफ्याचे वांटेकरी केले म्हणजे समाजवाद्यांना मजूर वर्गाविषयीं वाटणाऱ्या सहानुभूतीला उतरती कळा लागणार नाहीं का? मालक-मजूर या लढ्यांत साधारणपणें मजुरांविषयीं वाटणाऱ्या सहानुभूतीची पार्श्वभूमि, मजुरांना नफ्यामध्यें वांटा दिल्यास नष्ट होईल. आजच्या भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे भांडवलदारांप्रमाणें मजूर हेही समान आधारस्तंभ बनतील. कदाचित अर्थव्यवस्थेचा विचार उपयुक्ततेच्या दृष्टीनें केला गेला तर मात्र मालक किंवा मजूर यांपैकीं कोणाकडेहि द्वेषैकदृष्टीनें पाहण्याचें कारण उरणार नाहीं. हिंदनें यापुढें भांडवलशाही विरुद्ध समाजवाद, अशी दृष्टि न ठेवतां, उपयुक्ततेच्या व कार्यक्षमतेच्या दृष्टीनें पाहिलें पाहिजे व उत्पादनाची मोहिम यशस्वी केली पाहिजे. हा दृष्टिकोन ठेवल्यास मात्र मजुरांच्या नफ्यांतील वांट्याला मान्यता देणें ही गोष्ट निःसंशय फायदेशीर ठरणें शक्य आहे. भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे दोष कांहींसे सहकारी तत्त्वाच्या अंमलबजाणीनें दूर होऊं शकतात. त्याचप्रमाणें नफ्याच्या वांट्यांत मजुरांना वाटेकरी करून भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे दोष दूर होण्याला मदतच होईल.

### सत्कार-समारंभ

सांगली संस्थानच्या सहकारी खात्याचे ऑडिटर श्री. भगवान बापू कुलकर्णी, दुधोंडीकर हे ता. १-६-४८ पासून सेवानिवृत्त झाल्यानें तेथील को. सेलशॉप, रजि. को. सो. ऑफीस व ग्रामोद्धार खातें वगैरेकडून त्यांचा गेल्या आठवड्यांत वेगवेगळा सत्कार करण्यांत येऊन त्यांच्या गेल्या १४ वर्षांच्या सहकारी चळवळींतील कार्याबद्दल गौरवपर भाषणें झालीं. विशेषतः मे. पाटील ( रजि. ), मे. पाटणकर ( अ. रजि. ), श्री. जोशी ( प्रौढ शिक्षणाधिकारी ), श्री. काजी ( मंगळवेढें ), श्री. अरभावी ( शहापूर ), श्री. ठाणेदार ( मॅनेजर सें. को. बॅंक ) व श्री. पटवर्धन, खाडे, लिमये यांनीं त्यांच्या विविध कार्याबद्दल आपले अनुभव विदित केले.

**धान्याच्या उत्पादनासाठी बक्षिसांची योजना**—शेतकऱ्यां-मध्यें मित्रत्वाची स्पर्धा लावून अधिक धान्य उत्पादन करण्याला उत्तेजन देण्यासाठी मुंबई सरकारनें एक वर्षापुरती एक बक्षिसाची योजना मंजूर केली आहे. जो शेतकरी दर एकरीं जास्तींत जास्त अन्नधान्य उत्पादन करील त्याला ह्या योजनेप्रमाणें बक्षिसें देण्यांत येतील. प्रत्येक तालुक्यांत होणाऱ्या मुख्य पिकासंबंधीं ही स्पर्धा ठेवण्यांत येणार आहे. प्रत्येक तालुक्याला तीन बक्षिसें ठेवण्यांत येतील. पहिलें बाक्षिस ७४ रु. चें, २ रें ५० रु. चें व तिसरें २५ रु. चें आहे. योजना जिल्हा रूरल डेव्हलपमेंट बोर्डातर्फे अंमलांत आणली जाईल.

दी

**बॅंक ऑफ कोल्हापूर, लि.**

( एच. एच. दी छत्रपति महाराजा ऑफ कोल्हापूर ह्यांचे सरकारचे आश्रयाखालील व त्यांचा फार मोठा पाठिंबा मिळत असलेली )

[ कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली. ]

स्थापना : १९२६

मुख्य कचेरी :

**सर बर्डवुड रोड, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.**

तार : BANKOP फोन : २८९

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ४०,०६,५०० रु. |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | २०,२६,००० रु. |
| वसूल | १०,१३,००० रु. |
| रिझर्व्ह फंड | ७,७१,००० रु. |
| खेळतें भांडवल | १,८८,००,००० रु. हून अधिक |

शाखा :

(१) गुजरी (२) शाहुपुरी-कोल्हापूर (३) मलकापूर (४) पेठ वडगांव (५) जयसिंगपूर (६) इचलकरंजी (७) गडहिंग्लज (८) निपाणी (जि. बेळगांव) (९) मुंबई (१०) मांडवी-मुंबई.

—बॅंकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात—

मुख्य कचेरींतील सेफ डिपॉझिट लॉकर्सच्या उत्तम व्यवस्थेचा फायदा घ्या.

व्ही. ए. सामंत, जनरल मॅनेजर.

## दि सेंट्रल म्युच्युअल लाइफ इन्शुरन्स कंपनी लि., मुंबई

### अध्यक्ष, श्री. शांतिलाल शहा, ह्यांचें वार्षिक सभेंतील भाषण

### ( १९ जून, १९४८ )

सेंट्रल म्युच्युअल विमा कंपनीच्या चौथ्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या प्रसंगीं कंपनीचे अध्यक्ष श्री. शांतिलाल शहा ह्यांनीं केलेल्या भाषणांतील कांहीं महत्त्वाचा भाग पुढें दिला आहे:--

### कंपनीची प्रगति

"अहवालाच्या सालीं कंपनीनें एकूण २७२ विमा अर्ज स्वीकारून ५,४१,५०० रु. चें काम पूर्ण केलें. कंपनीच रिन्यूअलचें खर्चाचें प्रमाण रिन्यूअलच्या हप्त्यांच्या उत्पन्नाच्या १२½ टक्के आहे. वर्ष-अखेर कंपनीच्या विमा-निधींत ५४,००० रु. ची भर पडून तो १,९६,७९५ रु. इतका झाला आहे. पुढच्या वर्षी कंपनीचें मूल्यमापन करण्यांत येणार असून, कंपनीला प्राप्तीवरील करही भरावा लागेल. त्यासाठी आम्ही यंदाच रिझर्व्ह फंड निर्माण केला आहे. कंपनीला हक्क-पूर्तीसाठी फक्त १०,००० रुपये द्यावे लागतील. त्याबद्दलची सूचना कंपनीकडे आली आहे. तथापि त्यांतील ५,००० रु. ची जोखीम रिइन्शुअर केलेली आहे. ह्यावरून आपल्या लक्षांत येईल कीं, वाटेल तो खर्च करून नवीन धंदा मिळविण्याऐवजीं कमी खर्चानें स्थिर स्वरूपाचा धंदा सावकाशीनें मिळविण्याचेंच बोर्डाचें धोरण आहे.

### विम्याच्या धंद्यापुढील प्रश्न

" सरकारनें विमा कायद्यांत दुरुस्ती करणारें बिल मागें घेतलें आहे. तथापि, घटना समितीच्या पुढील अधिवेशनांत तें बिल दुरुस्त स्वरूपांत मांडलें जाण्याचा संभव आहे. कंपन्यांच्या वाढ खर्चावर नियंत्रण घालण्यासंबंधींचें बिलांतील कलम स्वागतार्ह आहे. तथापि पैसे गुंतविण्यासंबंधीच्या कलमानें कंपन्यांच्या अंतर्गत व्यवस्थेंत मर्यादेबाहेर ढवळाढवळ होते, असें मला वाटतें. त्याचप्रमाणें, चीफ एजंट अगर कंपनीचा मुख्य कार्याधिकारी ह्यांना किती कमिशन अगर पगार असावा ह्या बाबतींतही निर्बंध घालण्याचें कारण नाहीं. त्यामुळें, म्युच्युअल आणि कोऑपरेटिव्ह विमा कंपन्यांना फार अडचणी निर्माण होतील. विमा पत्रकांच्या एकंदर जोखमीपैकीं ५५ टक्के भाग सरकारी अगर सरकारमान्य रोख्यांत गुंतवावा असें विमा कायद्याचें बंधन आहे. पण ह्या रोख्यांच्या किंमतींत घट झाल्यास मात्र सरकार त्याची हमी घेत नाहीं. ती जबाबदारी सरकार घेत नसेल तर एकूण इन्व्हेस्टमेंटपैकीं ६० टक्केपर्यंत पैसे गुंतविण्याचें पूर्ण स्वातंत्र्य असावें. ह्या शिवाय निदान २ लाख रुपयांपर्यंत तरी रक्कम नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकेट्समध्यें गुंतविण्याची परवानगी विमा कंपन्यांना देण्यांत यावी. ही सवलत कोऑपरेटिव्ह बँका व विमा कंपन्यांप्रमाणें म्युच्युअल कंपन्यांनाही देण्यांत यावी.

### प्राप्तीवरील कराचा दर कमी करा.

" सरकारचें प्राप्तीवरील कराचें खातें कंपन्यांच्या मूल्यामापन-प्रसंगीं प्राप्तीवरील कराची आकारणी करतें. मूल्यमापनांत तीन गोष्टींना महत्त्व असतें. ( १ ) गुंतविलेल्या पैशावरील व्याज, ( २ ) खर्चाचें किमान प्रमाण आणि ( ३ ) विमा कंपनीला आलेला विमेदारांच्या मृत्यूचा अनुभव. ह्यापैकीं व्याजाच्या उत्पन्नावर कर बसविण्यास हरकत नाहीं. पण, त्यांत सुद्धां विशेषत: म्युच्युअल विमा कंपन्यांना सवलत देण्यांत आली पाहिजे. भांडवलावर उभारलेल्या विमा कंपन्यांना येणारें व्याजाचें उत्पन्न विनायास मिळालेलें म्हणतां येईल. पण म्युच्युअल कंपन्यांच्या बाबतींत असें म्हणतां यावयाचें नाहीं. हिंदी संघराज्याचे फडणीस ही गोष्ट लक्षांत घेऊन प्राप्तीवरील कराचा दर रुपयामागें ३६ पैपर्यंत उतरवितील अशी आशा मी करतों. गेल्या वर्षी लहान विमा कंपन्यांना निम्म्या दरानें कर आकारून फडणीसांनीं सवलत दिली ह्याबद्दल मला समाधान वाटतें. त्याच्याही पुढें जाऊन निदान म्युच्युअल कंपन्यांना तरी सरकार अधिक सवलती देईल अशी आशा मी करतों. "

---

### रोख्यांच्या किंमतींचे निदर्शक आकडे

| | मे १९४७ | एप्रिल १९४८ | मे १९४८ | बारा महिन्यांतील फरक |
|---|---|---|---|---|
| सरकारी रोखे | ११७·९ | ११४·३ | ११४·९ | —३·० |
| निश्चित व्याजाचे प्रेफरन्स शेअर्स | १७१·५ | १६२·२ | १६१·२ | —१०·३ |
| अनिश्चित व्याजाचे ऑर्डिनरी शेअर्स | २१५.२ | १७०·८ | १७३·३ | —४१·९ |

सरकारी रोख्यांच्या किंमतींत मे, १९४८ मध्यें एप्रिल, १९४८ चे मानानें किंचित् सुधारणा ( +०·६ ) झाली, तरी बारा महिन्यापूर्वीच्या मानानें त्यांच्या किंमतींत घट ( –३·० ) आहे. प्रेफरन्स भागांच्या किंमतींहि गेल्या बारा महिन्यांत १०·३ उतरल्या. ऑर्डिनरी शेअर्सच्या किंमतींत तर बारा महिन्यांत ४१·९% घट झाली; त्यांत कोळसा, लोखंड–पोलाद, कागद, इत्यादींचे शेअर्स प्रमुख आहेत

---

**आंतरराष्ट्रीय सहकारी कॉंग्रेस**—अखिल–भारतीय सहकारी संस्थांच्या मध्यवर्ती संघाचे अध्यक्ष प्रो. काजी हे लवकरच, सप्टेंबर १९४८ मध्यें प्राग येथें भरणाऱ्या आंतरराष्ट्रीय सहकारी कॉंग्रेससाठी युरोपांत जाणार आहेत. इंग्लंड आणि युरोपांतील सहकारी संस्थांना ते भेटी देणार आहेत. इंटर नॅशनल कोऑपरेटिव्ह स्कूलमध्यें ते कांहीं व्याख्यानेंही देणार आहेत.

**जोधपूर संस्थानांत कोळसा**—जोधपूर संस्थानांतील शेओ ह्या जिल्ह्यांत 'लिग्नाइट' जातीचा कोळसा सांपडण्याची शक्यता आहे असें समजतें. हिंदुस्थान सरकारच्या खनिज खात्याचे माजी प्रमुख सर सिरिल फॉक्स ह्यांनींच वरील संभव बोलून दाखविला आहे. मुंबई येथील सीमेंटेशन कंपनीला खणण्याचें काम देण्यांत आलें आहे. कोळसा सांपडतो कीं नाहीं हें पहाण्यासाठी ३०० फूट खोदण्यांत येणार आहे. खणण्याच्या कामाला लवकरच प्रारंभ होणार आहे. काम पूर्ण होण्यास ३ महिने लागतील.

**चीनमध्यें नोटांचा सुकाळ**—चीनमध्यें चलनी नोटांचा इतका सुकाळ झाला आहे कीं पगार घेण्यासाठी कागदी पाकिटें नेण्याऐवजीं लोक आतां पोतीं घेऊन जाऊं लागले आहेत ! कोणत्याहि दुकानांत १० लाख चिनी डॉलर्सच्या नोटा सहज दिसून येतात. चीनमध्यें अच्छेर तांदुळाला जवळ जवळ ९० लाख चिनी डॉलर्स किंमत द्यावी लागते. एका अमेरिकन डॉलरला काळ्या बाजारांतील भावाप्रमाणें ४० लाख चिनी डॉलर्स द्यावे लागतात.

**निरापानाला उत्तेजन**—१९४८–४९ सालीं निरापानाला आणि ताडीपासून होणाऱ्या पदार्थांच्या निर्मितीला उत्तेजन देण्याचें धोरण मुंबई सरकारनें पुढें चालविण्याचें ठरविलें आहे. त्यासाठी शिक्षण देणारें एक केंद्र उघडण्यांत येणार असून पगारी नोकरही ठेवण्यांत येणार आहेत.

# हिंदी शेतमालासाठी बाजार-पेठा वाढविण्याचा प्रश्न

## हिंद सरकारच्या समितीच्या शिफारसी

### सहकारी विक्री संस्थांस चालना देण्याची सूचना

हिंद सरकारनें नेमलेल्या शेतकी, जंगलें व मासेमारी यांबाबतच्या धोरण समितीच्या विक्री उपसमितीनें ( मार्केटिंग सबकमिटीनें ) नुकत्याच सादर केलेल्या अहवालांत देशांतील शेतमालाच्या विक्रीसंबंधीं होणाऱ्या कार्याचा मेळ बसविण्यासाठीं एक अखिल भारतीय स्वरूपाचें विक्री मंडळ ( ऑल इन्डिया मार्केटिंग बोर्ड ) स्थापन करण्यांत यावें अशी शिफारस केली आहे.

हिंदुस्थानांत शेतमालाला सुलभपणें बाजारपेठा मिळवून देण्याच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं या उपसमितीची स्थापना करण्यांत आली होती व सर टी. विजयराघवाचार्य हे तिचे अध्यक्ष होते. बाजारपेठांची सुधारणा, मालाचा दर्जा व शुद्धता, वखारींची स्थापना, मध्यवर्ती शेतमाल विक्रीखात्याची संघटना व कामें, वगैरे बाबींचा अभ्यास करून त्याबाबत शिफारसी करण्यास उपसमितीला सांगण्यांत आलें होतें.

उपसमितीच्या शिफारसीप्रमाणें शेतमालाच्या बाबतींत संशोधन करणें, दर्जाप्रमाणें मालाची प्रतवारी ठरविणें, विक्रीच्या सुधारलेल्या पद्धतीबाबत प्रात्यक्षिकें देणें व प्रचार करणें, भाव ठरविणें आणि निरनिराळ्या भागांचे शेतमालाचे वाटे व जकातीचे निर्बंध ठरवून देणें ही या अखिल भारतीय विक्रीमंडळाचीं कामें असतील.

### सहकारी संस्थांचें जाळें

बाजारपेठांची सोय उपलब्ध झाल्यास, शेतकऱ्याला उत्पादन वाढविण्यास मोठी चालना मिळेल, असें मत व्यक्त करून समितीनें त्या दृष्टीनें अनेक शिफारसी केल्या आहेत.

सहकारी विक्री संस्थांचें एक जाळेंच तयार करण्यांत यावें असें उपसमितीनें आग्रहानें प्रतिपादिलें आहे. जेथें ६० टक्के शेतकरी अशा संस्थेंत भाग घेण्यास तयार असतील अशा प्रत्येक खेड्यांत सहकारी संस्था स्थापन झाली पाहिजे. जरूर पडल्यास या बाबतींत सक्तीहि करण्यास हरकत नाहीं. अशा संस्थांचे संघ तयार होतील व शिरोभागीं प्रांतिक संघ रहातील. मालाचा योग्य प्रकारें सांठा करणें, प्रत ठरविणें आणि अखेरीस हा माल आपल्या सभासदांस विकण्याची व्यवस्था करणें हीं कामें या संस्था करतील. जेथें अशा सहकारी संघटना स्थापन करणें शक्य नसेल, तेथें संयुक्तप्रांत व मद्रासच्या अन्नधान्य वसुली समित्यांच्या धर्तीवर खास विक्री समित्या ( मार्केटिंग कमिट्या ) स्थापन कराव्यात.

### वहातुकीची व्यवस्था

प्रत्येक खेडेगांवानजीकच्या बाजारपेठेला चांगल्या प्रकारच्या रस्त्यानें जोडलें गेलें पाहिजे, यावर उपसमितीनें विशेष भर दिला आहे. असे रस्ते सर्व ऋतुमानांत चांगल्या स्थितींत राहिले पाहिजेत. रेल्वे व रस्त्यावरील वहातुकीच्या दरांचा योग्य प्रकारें मेळ बसविण्यांत यावा आणि या दोन्ही वहातुकीच्या साधनांच्या केंद्रांच्या ठिकाणीं माल संग्रह करून ठेवण्याची नीट अशी व्यवस्था असावी अशीहि समितीनें सूचना केली आहे.

### पाकिस्तान बँक रेट

स्टेट बँक ऑफ पाकिस्तान बँक रेट ३% ठरविण्यांत आला आहे. रिझर्व्ह बँक रेट १९३५ पासून ३% कायम आहे.


विमेदारांचे नियंत्रणाखाली चाललेली व त्यांचेच मालकीची आदर्श विमा कंपनी

**दि सुप्रीम म्यूच्युअल ॲशुअरन्स कंपनी लि.**

आपली सुप्रीम म्यूच्युअलची निवड योग्य आहे.

--कारण--

★-ती भक्कम पायावर आधारलेली आहे.

★★-विमेदारांचें हित हेंच तिचें ध्येय आहे.

★★★-विम्याचे क्लेम्स देण्यांत ती अत्यंत दक्ष आहे.

★★★★-विमेदारांना सोईच्या व आवडीच्या विमायोजना देण्यांत विशेष लक्ष घालते.


आजच पॉलिसी घेऊन भविष्यकाळाची तरतूद करणें आपलें हिताचे आहे.

सढळ अटीवर एजन्सीज देणें आहेत. -भेटा अगर लिहा-

त्र्यं. दा. देशपांडे, बी. ए., एलएल. बी., सेक्रेटरी

व. न. म्हैसूर, एम. ए., एटएल. बी., मॅनेजर

हेड ऑफिसः-८६६ सदाशिव पेठ, पुणें २.



अधिक धान्य पिकविण्याची योजना

—यशस्वी होण्यास—

**किर्लोस्कर पंपिंग सेट्स**

हें अमोघ साधन आहे.

त्याचें सहाय घ्या !

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी

## प्रांतिक सहकारी इन्स्टिटयूटच्या शिक्षणफंडास सहकारी सोसायट्यांचा हातभार

### सहकारी कानूंतील नियोजित दुरुस्ती.

आपल्या भागीदारांना ४% किंवा त्यापेक्षा ज्यास्त दरानें डिव्हिडंड देणाऱ्या प्रत्येक सहकारी सोसायटीनें इन्स्टिटयूटच्या शिक्षणफंडास खालीलप्रमाणें वर्गणी दिलीच पाहिजे:—

| डिव्हिडंडचा दर | वर्गणीची रकम |
|---|---|
| ४% | नफ्याच्या १% |
| ५% पेक्षा अधिक नाहीं | ” १¼% |
| ६¼% पेक्षा अधिक नाहीं | ” १½% |

सोसायटीच्या नफ्याची रकम २०० रुपयांपेक्षा आधिक भरली नाहीं, तर मात्र इन्स्टिटयूटच्या शिक्षणफंडास वर्गणी देण्यास ती बांधलेली नाहीं.

### तेलाच्या घाण्यांना उत्तेजन

मुंबई प्रांतांतील तेलाच्या घाण्यांना उत्तेजन देण्यासाठीं मुंबई सरकारनें एक योजना मंजूर केली आहे. तेलाच्या घाण्याचा धंदा करणाऱ्या चार सहकारी संस्था सरकारनें निवडल्या असून त्यांना पुढील प्रमाणें मदत करण्यांत येणार आहे.

| | पंढरपूर | खेड | चरेगांव | चांदवड |
|---|---|---|---|---|
| | रु. | रु. | रु. | रु. |
| (१) सेंट्रल फिनान्सिंग एजन्सीला सरकारी हमी | ९६,००० | ६१,९२० | ३२,४०० | १५,१८० |
| (२) घाणे व इतर उपकरणांच्या खरेदीसाठीं कर्ज | २,१०० | २,७२५ | २,१०० | २,८५० |
| (३) (अ) ऑइल एंजिन व टरफलें काढणाऱ्या यंत्रासाठी ४% दराचें कर्ज | | ७,९०० | | |
| (ब) मोटार ट्रक घेण्यासाठीं ४% दराचें कर्ज | | | १०,००० | |
| (४) कोठाराच्या भाड्याच्या ½ भाड्यापर्यंत परंतु दरवर्षीला रु. ३०० पेक्षा अधिक नाहीं इतकी मदत | ३०० | ३०० | ३०० | ३०० |

( ५ ) खेड आणि चरेगांव सहकारी संस्थांसाठी ७५-५/२-९० श्रेणीचा सब ऑडिटर. पंढरपूर येथील संस्थेसाठीं सीनिअर सब ऑडिटर, वेतनश्रेणी ९५-५-१३० किंवा चरेगांव व चांदवड येथील संस्थांसाठीं बाँबे प्रॉव्हिन्शिअल कोआपरेटिव्ह बँकेच्या नोकरांनीं मॅनेजर म्हणून काम करावें. त्यांचें वेतन दरवर्षी रु. १,५०० वर जातां कामा नये.


दि सेन्ट्रल म्युच्युअल विमा कंपनी, लिमिटेड

हेड ऑफिसः—लालगीर चेंबर्स, फोर्ट, मुंबई.

★ नव्या कामाचे मोठे आकडे हेंच केवळ विमा कंपनीच्या यशाचें खरें गमक नव्हे. विमेदारांची योग्य निवड, काटकसरीची शास्त्रशुद्ध पण चोख व्यवस्था याचीच या धंद्यास खरी जरूरी आहे.

आमचा कारभार वरील तत्त्वानुसारच चालतो, याची आजच खात्री करून घ्या.

शं. न. आगाशे
मॅनेजिंग डायरेक्टर






नवीन पुष्कळ निघाले, तरी
तुळजाराम मोदी, सातारा
ह्यांचें पुढारीपण कायम आहे.





हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत ग. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व ग. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गानिवास,' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें